# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील ४४ हजारांहून अधिक शाळांमध्ये संगणक नसल्याबाबत**

**(१) २९१५३ (२१-०१-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर (जि. नादेड) सह राज्यातील एकुण शाळांपैकी ४४ हजारांहून अधिक शाळांमध्ये संगणक नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भोकर तालुक्यातील (जि.नांदेड) येथील जिल्हा परिषदेच्या ८६ शाळेत अद्याप संगणकच उपलब्ध न झाल्यामुळे येथील ४ हजार १४४ विद्यार्थ्यांना शिक्षकांनी तोंडी सांगितलेल्या संगणकाच्या माहितीवरच थांबावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहावी-सातवीच्या शाळांपैकी ८५.७ टक्के शाळांमध्ये संगणकाशी निगडीत लर्निग लॅब नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनेक शाळा संगणक सुविधेविषयी गंभीर नसून विजेचा पुरवठा आणि संगणकाची सुविधा असणा-या शाळांची संख्या जवळपास सारखीच आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने याबाबत कोणती उपाययोजना केली अथवा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०६-२०१७) : (**१), (२), (३) व (४) अंशत: खरे आहे

(५) राज्यातील शासकीय उच्च प्राथमिक शाळांना डिजीटल करण्यासाठी सर्व शिक्षा अभियानातून निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**मुंबई विद्यापीठाच्या परिक्षा विभागच्या बेजबाबदार कारभारामुळे बी.कॉमच्या तृतीय फायनान्सच्या प्रश्नपत्रिकेत चुकीची एण्ट्री देण्यात आल्याबाबत**

**(२) ५५९२१ (२२-०८-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या परिक्षा विभागाच्या बेजबाबदार कारभारामुळे बी.कॉमच्या तृतीय फायनान्सच्या प्रश्नपत्रिकेत चुकीची एण्ट्री देण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये गोंधळ उडून त्यांच्या आठ गुणांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा विभागाच्या बेजबाबदार कारभाराची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरील प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) (Financial Market, T.Y. B,com, (Sem VI) (CBSGS) या विषयाची परिक्षा परिक्षाकेंद्रावर सुरु असताना वेळेअधीच प्रश्नपत्रिकेमधील प्रश्न क्र. ५ A बाबतच्या त्रुटीचे निवारण केल्याने व परिक्षा केंद्राना वेळेत कळविण्यात आल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झालेले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयात शिक्षकांचे थकित वेतनाबाबत**

**(३) ५७०१६ (२२-०८-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील अनेक अर्धवेळ शिक्षकांचे थकीत वेतन तात्काळ सुरु करण्याचे लेखी आदेश दिले असतांनाही तीन महिने झाले तरी माध्यमिक. विभागाच्या शिक्षणाधिका-यांनी अधिक्षक (माध्यमिक) वेतन व भविष्य निर्वाह निधी पथकाला लेखी आदेश दिलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे जिल्हयातील अर्धवेळ शिक्षकांचे तीन वर्षाचे वेतन थकीत राहिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शिक्षकांचे पगार प्रत्येक महिन्याच्या १ तारखेस देण्याचा निर्णय घेवूनही कोल्हापूर जिल्हयात शिक्षकांचे पगार प्रत्येक महिन्याच्या १ तारखेस होत नसल्याचे माहे जून, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीनुसार शिक्षकांचे थकित वेतन तसेच मासिक वेतन प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला होणेकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०६-२०१७)** :(१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात जिल्हास्तरीय पर्यावरण समिती व पर्यावरण तज्ञ मूल्यांकन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली असल्याबाबत

**(४) ६२५७५ (१०-०८-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नद्यांमधील वाळू, दगडखाणीतून दगड उत्खननासाठी आवश्यक असलेले पर्यावरण विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र आता जिल्हास्तरावरच मिळणार असून त्यासाठी जिल्हास्तरीय पर्यावरण समिती व पर्यावरण तज्ञ मूल्यांकन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरेआहे काय,
(२) असल्यास, शासनाने या जिल्हास्तरीय समित्या तातडीने गठीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२७-०६-२०१७)** :(१) राज्यातील नदयांमधील वाळू, दगडखाणीतून दगड उत्खननासाठी आवश्यक असलेले पर्यावरण विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र आता जिल्हा स्तरावर मिळणार असून त्यासाठी शासनाने दिनांक २.२.२०१६ रोजी परिपत्रक काढले आहे, हे खरे आहे.
(२) कार्यवाही चालू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यावतील रात्रशाळांमधील शिक्षकांना वेळेवर पगार मिळण्याबाबत

**(५) ६५२८४ (०५-०१-२०१७). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रात्रशाळांमधील अतिरिक्त शिक्षक गत दोन महिन्यांपासून वेतनाच्या प्रतिक्षेत असल्याचे दिनांक २६ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत लवकरच निर्णय घेऊन कार्यवाही करणार असल्याचे शिक्षण मंत्री महोदयांनी आश्वासन दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने रात्रशाळांतील शिक्षकांचे पगार वेळेवर मिळावेत याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२२-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यामील अल्पसंख्यांकाच्या तथाकथित वक्फ मंडळाच्या जमिनीवरील अतिक्रमणे निष्काशित करण्याबाबत**

**(६) ६५७०४ (२७-०१-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः अहमदनगर जिल्ह्यातील अल्पसंख्यांकाच्या तथाकथित वक्फ मंडळाच्या जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबतची मागणी राज्यातील अल्पसंख्यांक समुदायाच्या नागरिकांनी, धार्मिक नेत्यांनी, स्थानिक जनप्रतिनिधींनी व सेवाभावी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री (अल्पसंख्यांक विकास), मा. राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास), प्रधान सचिव (अल्पसंख्यांक विकास), तसेच संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा विभागीय महसूल आयुक्त (नाशिक), तसेच संबंधित वा त्यांच्या आधिपत्याखालील व इतर तत्सम अधिकाऱ्यांकडे माहे जुलै,२०१६ मध्ये वा त्या दरम्यान लेखीनिवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, राज्यातील वक्फ मंडळाच्या अधिपत्याखालील सुमारे ९७ हजार एकर जमिनीपैकी ७० टक्के जमिनीवर झालेली अतिक्रमणे तात्काळ पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याचे निदेश शासनाने वक्फ मंडळाला दिले असून वक्फ मंडळाने आजतागायत किती एकर जमिनीवरील अतिक्रमण निष्कासित केले आहे,
(३) तसेच , प्रश्नोक्त बाब (१) च्या अनुषंगाने संबंधित अल्पसंख्यांक विभागाच्यावतीने तसेच जनप्रतिनिधी व जागृत नागरिकांच्या तसेच अल्पसंख्यांकांच्या संघटनेने सदर बाब वेळोवेळी निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२१-०६-२०१७) :** (१) व (२) माहे जुलै, २०१६ व त्या दरम्यान असे निवेदन प्राप्त झाले किंवा कसे याबाबत प्रश्नात उल्लेखित कार्यालयाकडून माहिती मागविण्यात आली असता कोणत्याही कार्यालयाने असे निवेदन प्राप्त झाल्याचा अहवाल सादर केलेला नाही. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या अधिपत्याखालील ज्या वक्फ मालमत्ता अतिक्रमणाखाली आहे त्या वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याविषयी शासन स्तरावरुन वक्फ मंडळाला वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. वक्फ मंडळाच्या अधिपत्याखालील वक्फ जमिनीपैकी नेमकी किती जमीन अतिक्रमणाखाली आहे, याबाबतची निश्चित आकडेवारी सद्य:स्थितीत उपलब्ध नाही. तथापि, वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४(६) येथील तरतुदीनुसार राज्यातील वक्फ मालमत्तांचे दुसरे सर्व्हेक्षण करण्यासाठी जमाबंदी आयुक्त यांची दि.०७.१२.२०१६ च्या अधिसूचनेद्वारे सर्व्हेक्षण आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. राज्यातील वक्फ मालमत्ता सद्य:स्थितीत नेमक्या कोणाच्या ताब्यात आहेत व सदर ताबा कायदेशीर आहे किंवा कसे याबाबीची देखील सदर सर्व्हेक्षणात नोंद घेतली जाणार आहे.सबब राज्यातील नेमकी किती वक्फ जमीन अतिक्रमणाखाली आहे याबाबतची निश्चित माहिती सदर सर्व्हेक्षणाना नंतर उपलब्ध होऊन सदर अतिक्रमणे निष्कासित करण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

(३) सन २०१४ च्या चौथे (हिवाळी) अधिवेशनात विभानसभेत तारांकित प्रश्न क्र.१८४० संदर्भात झालेल्या चर्चे दरम्यान एका सन्मा.सदस्याने सदर मुद्दा उपस्थित केला होता. त्यास अनुसरुन तत्कालीन मा.मंत्री, अल्पसंख्याक विकास यांनी पुढीलप्रमाणे आश्वासन दिले होते,- “अध्यक्ष महोदय, अहमदनगर के संबंध में हम जरुर जानकारी लेंगे वहांपर कानून के बाहर अगर कोई काम हुआ होगा तो उस संबंध में जरुर कारवाई की जायेगी” सदर आश्वासनास अनुसरुन सन्माननीय सदस्यांकडून शासन पत्र दि.१.७.२०१५, २५.८.२०१५, दि.७.१०.२०१५ आणि दि.१८.११.२०१५ अन्वये माहिती मागविण्यात आली होती. मात्र याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

तथापि, वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ५४ अन्वये बेकायदेशीर अतिक्रमण करणाऱ्याविरुध्द प्रादेशिक वक्फ अधिकारी, नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडून कार्यवाही करण्यात येत असल्याचा अहवाल वक्फ मंडळाने सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पुणे जिल्हयातील जुन्नरच्या कार्यालयात शालेय पोषण आहाराच्या इंधन अनुदानात झालेला अपहार**

**(७) ६७२७७ (०५-०१-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील जुन्नरच्या कार्यालयास शालेय पोषण आहाराच्या इंधन अनुदानात अपहार झाल्या प्रकरणी सिल करण्यात आल्याचे दिनांक ६ ऑगस्ट] २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील डाटा एंट्री ऑपरेटरला कार्यमुक्त करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इंधन अनुदानासाठी शालेय पोषण आहार योजनेत जुन्नर तालुक्यात ४३८ शाळांचा समावेश असताना प्रत्यक्ष मात्र १४३ शाळांना अनुदान देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ज्या शाळांच्या मुख्याध्यापकांनी गैरमार्गाने ५० टक्के रक्कम परत करण्याचे नाकारले अशा शाळांना अनुदान देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२१-०६-२०१७) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) अंशत: हे खरे आहे.

(५) याबाबत चौकशी करण्यात आली असून संबंधित अधिक्षक (शालेय पोषण आहार योजना) व डाटा एन्ट्री ऑपरेटर यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आरटीई कायदयाचे काटेकोर पालन करण्याचे बंधन शैक्षणिक संस्थांना घालण्याबाबत**

**(८) ६७५१९ (०५-०१-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळा सुरु होवून दिनांक १९ जून २०१६ रोजी पर्यंत एकूण ७ जिल्हयांमध्ये शिक्षक हक्क कायदयानुसार (आरटीई) एकाही विद्यार्थ्याला प्रवेश देण्यात आलेला नव्हता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सुमारे ७३ हजार १९४ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज केलेला असताना केवळ २३ हजार २८८ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाले असून ४९ हजार ९०६ विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरटीई प्राथमिक व पूर्व प्राथमिक शाळांमध्ये २५ टक्के प्रवेश हे आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना देणे बंधनकारक असतानाही २५ टक्के प्रवेश दिले जात नाहीत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे जिल्हयातील १७ हजार ९७ विद्यार्थ्यांनी अर्ज केलेले असताना केवळ ५ हजार २१३ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने आरटीई कायदयाचे काटेकोर पालन करण्याचे बंधन शैक्षणिक संस्थांना घालण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२१-०६-२०१७)** :(१) हे खरे नाही.

(२) सन २०१६-१७ यावर्षी एकूण ७७९३७ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी ४१८२९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) पुणे जिल्ह्यात एकूण १७९३१ अर्जांपैकी ८८९९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत.

(५) दिनांक १० जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये आरटीई कायद्याचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनेच्या मागंण्याबाबत

**(९) ६९९२८ (०५-०१-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनेमार्फत दिनांक ८ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास शिक्षण आयुक्त कार्यालयावर महामोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांच्या निवेदनामध्ये कोणत्या प्रमुख मागण्या मांडण्यात आलेल्या आहेत,

(३) असल्यास, शासनाने सदर मागण्यां संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०६-२०१७)** : (१) हे खरे आहे.

(२) १.राज्यातील खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांतील कार्यरत असणाऱ्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर त्यांच्या संवर्गानुसार देय ठरणाऱ्या आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ अदा करण्यासंदर्भात.

२.मान्यताप्राप्त खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचा शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाबाबत.

(३) व (४) शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

**खटाव (जि.सातारा) तालुक्यामध्ये कातरखटाव मधील जिल्हा परिषदेच्या शाळेची पटसंख्या कमी झाल्याने अनेक वर्षे बंद अवस्थेत असल्याबाबत**

**(१०) ७०९४७ (०५-०१-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खटाव (जि.सातारा) तालुक्यामध्ये कातरखटाव मधील जिल्हा परिषदेच्या शाळेची पटसंख्या कमी झाल्याने अनेक वर्षे बंद अवस्थेत असून, हायस्कूलचा दर्जाही खालावत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी नवनवीन उपक्रम वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१७-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) जिल्हा परिषद साताराने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी

१. ज्ञानरचनावादी अध्ययन-अध्यापन पध्दती

२. ज्ञानरचनावादी वर्ग रचना

३. क्रीडा प्रबोधिनी

४. विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास स्पर्धा

५. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत येणारे सर्व उपक्रम

६. ज्ञानचक्षू वाचनालय

७. यशवंत प्रयोगशाळा

८. स्व. यशवंतराव चव्हाण बाल क्रीडा स्पर्धा

९. ओझ्याविना शिक्षण व घोकंपट्टी मुक्त शिक्षण

१०. बालस्नेही शैक्षणिक साहित्य निर्मिती इत्यादी उपक्रम व शिक्षणातील नवविचार प्रवाहांची अंमलबजावणी केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील जिल्हयांमधून पश्चिम महाराष्ट्रात स्थलांतर करणाऱ्या उसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाबाबत**

**(११) ७१२९९ (०५-०१-२०१७). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हयांमधून उसतोड कामगार म्हणून दरवर्षी स्थलांतर करणाऱ्या उसतोड कामगारांची मुले शिक्षणापासून वंचित राहत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जालना जिल्हयांमधील युनिसेफच्या सहकार्याने राबविलेल्या मॉडेलचा प्रयोग अन्यत्र करण्याचे शासनाने योजले आहे हे ही, खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२१-०६-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

---

**हिंगोली जिल्हा परिषदेच्या २७० शाळेतील पोषण आहाराचे देयक थकले असल्याबाबत**

**(१२) ७२०६१ (०५-०१-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हा परिषदेच्या २७० शाळेतील पोषण आहाराचे देयक माहे मार्च, २०१६ पासून थकले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुपोषण निमुर्लन हेतूने सुरु केलेल्या या योजनेचा आहार विद्यार्थ्यांना ठरल्याप्रमाणे मिळत नसल्याबाबतच्या तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हिंगोली जिल्हापरिषदेच्या शाळेच्या पोषण आहार देयक मिळण्यासाठी शिक्षण विभागाकडे वेळोवेळी पाठपुरावा करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२१-०६-२०१७) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांना तातडीने अनुदान मिळण्याबाबत**

**(१३) ७३६४० (१६-१२-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांना तातडीने अनुदान देण्याचे शासनाने जाहीर केले आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांना शासनाकडून देण्यात येणाऱ्या अनुदानाबाबतच्या निकषांचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांना शासनाकडून किती कालावधीत अनुदान मिळणे अपेक्षित आहे;
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०६-२०१७) :** (१) होय.
(२) शासन निर्णय दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ अन्वये दिनांक १४ जून, २०१६ पूर्वी अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून २० टक्के प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले. तसेच दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये पात्र शाळांना अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाने शिक्षकांनी विद्यार्थ्यांबरोबर दर सोमवारी पहिल्या तासात सेल्फी काढण्याचा निर्णय मागे घेतल्याबाबतम**

**(१४) ७३८०० (२०-०४-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शाळाबाह्य विद्यार्थ्यांबरोबरच इरतही विद्यार्थ्यांची गळती थांबविण्याच्या दृष्टीने शासनाने दर सोमवारी शिक्षकांनी विद्यार्थ्यांबरोबरच ''सेल्फी'' काढण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ''सेल्फी'' काढण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मागे घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहु निर्णय मागे घेण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, शासनाने राज्यातील शाळाबाह्य विद्यार्थ्यांबरोबरच इरतही विद्यार्थ्यांची गळती थांबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२०-०६-२०१७) :**(१) होय.
(२) निर्णयाच्या अंमलबजावणीस तूर्त स्थगिती देण्यात आलेली आहे.
(३) शाळाबाह्य मुलांच्या उपस्थितीशी जोडण्यात आलेल्या सेल्फीच्या निर्णयाला शिक्षक व विद्यार्थी यांच्याशी जोडण्यात आल्याने विविध संघटनांनी याबाबत फेरविचार करण्याबाबत निवेदने दिलेली होती. या निवेदनांना अनुसरुन सदर निर्णय मागे घेण्यात आलेला आहे.

(४) राज्यात यापुढील काळात एकसुध्दा मुल शाळाबाह्य किंवा शिक्षणबाह्य राहणार नाही यासाठी शिक्षण विभाग संवेदनशील असून त्यादृष्टीने नियोजनपूर्वक काम करत आहे. शाळाबाह्य मुलांना नियमित शाळेत दाखल करुन त्यांचे नावे सरल प्रणालीत नोंदविण्याचे निर्देश दिले आहेत. अशा मुलांना सर्व शैक्षणिक सुविधा पुरविण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यामध्ये मुख्यमंत्री पेयजल कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(१५) ७३८६८ (२०-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील वाड्या, वस्त्यांमध्यील पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने सन २०१६-१७ ते २०१९-२० या ४ चार वर्षाच्या कालावधीसाठी मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना राबविण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील कोणत्या तालुक्यांमधील गांवे, वस्त्या व वाड्या यांचा समावेश सदर योजनेंतर्गत करण्यात आला आहे,
(३) असल्यास, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना या कार्यक्रमासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे व रायगड जिल्ह्यात या योजनेंतर्गत किती योजना सुरु करण्यात आल्या वा मंजूरी देण्यात आल्या आहेत,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (०३-०७-२०१७) :** (१) होय.
(२) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत रायगड जिल्ह्यात खालील १२ पाणीपुरवठा योजनां राबविण्याचे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | तालुका | योजना | समाविष्ट वाड्या/वस्त्या | अदाजित किंमत (रु. लक्ष) |
|---|---|---|---|---|
| १ | अलिबाग | मौ.नागाव | १ | २९७.०० |
| २ | | नवेदर नवगांव | १ | १९९.०० |
| ३ | | रुईशेत भोमोली | १ | २४.०० |
| ४ | | मौ. मानकुळे | १ | ९०.०० |
| ५ | | मौ. हेमनगर | १ | १५०.०० |
| ६ | पनवेल | मौ. सावले | १ | ७५.०० |
| ७ | | मौ. आदई | १ | १५०.०० |
| ८ | माणगांव | मौ.कविळवहाळ | १ | ७९.०० |
| ९ | उरण | मौ.कोर्पोली | १ | १००.०० |
| १० | | मौ. रानसई | १ | १५०.०० |
| ११ | रोहा | मौ. वरसे | १ | ३५०.०० |
| १२ | पेण | शहापाडा प्रादे. | ३८ | ३८५९.०० |

(३) सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सन २०१६-१७ ते २०१९-२० या चार वर्षाच्या कालावधीत रु.२५३०.८६ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.
सद्य:स्थितीत रायगड जिल्ह्यातील मौ. कोप्रोली, मौ. सावले, मौ. नागांव, मौ. वरसे, मौ. कविळवहाळ व मौ. शहापाडा या ०६ नळ पाणीपुरवठा योजनांना मंजूरी देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शिक्षण विभागाच्या अर्थसंकल्पाचा ४० टक्के निधी खाजगी शाळांवर खर्च होत असल्याबाबत**

**(१६) ७४३४० (२०-०४-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.संजय पोतनीस (कलिना), ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात, ६९ टक्के प्राथमिक शाळा या शासकीय यंत्रणा चालवीत असतानाही गत ४ वर्षात शिक्षण विभागाच्या अर्थसंकल्पापैकी ४० टक्के निधी हा खाजगी अनुदानीत आणि खाजगी विनाअनुदानीत शाळांवर खर्च होत असल्याची बाब 'सेंटर फॉर गव्हर्नस ॲण्ड अकाउंटीबिलीटी' (सीबीजीए) आणि 'क्राय' या संस्थेने केलेल्या पाहणी अहवालाद्वारे दिनांक १० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देशातील प्रत्येक विद्यार्थ्यांवर, केंद्र सरकार ३२,२६३ रूपये खर्च करीत असताना, राज्यात २८,६३० रूपये इतका खर्च करण्यांत येत असून कोठारी आयोगाने सन १९६६ मध्ये केलेल्या शिफारसीनुसार जीडीपीच्या ६ टक्केही निधी शिक्षणाकरिता खर्च करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, राज्यात एकूण ७.७ टक्के माध्यमिक शाळा या शासकीय, ६५.१ टक्के शाळा खाजगी अनुदानित तर २७.२ टक्के शाळा या खाजगी विना अनुदानित असून शाळेत जाणा-या एकुण विद्यार्थ्यांपैकी २४ टक्के विद्यार्थी हे सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासकीय माध्यमिक शाळांवर खर्च कमी केला जात असल्याने माध्यमिक शाळांमधील शैक्षणिक अवस्था अत्यंत दयनीय झाली असून विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाणात वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तद्‌नुषंगाने राज्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांला शिक्षण मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२२-०६-२०१७) :** (१) अंशतः खरे आहे. परंतु, निधी खर्च हा मुलांच्या संख्येवर अवलंबून असून, शाळा संख्येवर तंतोतंत अवलंबून नसते.
(२) व (३) होय. हे खरे आहे.
४) नाही. माध्यमिक शिक्षणाच्या प्रगतीसाठी शासनाने प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र माध्यमिक स्तर अभियान सुरु केले आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवनत नाही.

---

## पुणे, पूर्व प्राथमिक शाळांच्या "ट्री हाउस" या संस्थेने शहरातील तीन शाळा अचानकपणे बंद केल्याबाबत

**(१७) ७४३९२ (२०-०४-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे, पूर्व प्राथमिक शाळांच्या "ट्री हाउस" या संस्थेने शहरातील तीन शाळा अचानकपणे बंद केल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्षाचे नुकसान होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे, खरे आहे काय,
(२) असल्यास, "ट्री हाउस" संस्थेने शुल्क भरून शाळांमधे मुलांचे प्रवेश करून घेतले असतांना अचानकपणे दुरध्वनीद्‌वारे "ट्री हाउस" च्या शाळा बंद करण्यात येत असल्याचे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास "ट्री हाउस" संस्थेच्या या निर्णयाबाबत पालकांनी चौकशी केली असता जागेचे भाडे, व शिक्षकांचे वेतन संस्थेने दिले नसल्याने शाळा बंद करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अशा प्रकारे शासनाने विद्यार्थ्यांची व पालकांची फसवणूक करणाऱ्या उक्त शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०६-२०१७) :**(१) वर्तमानपत्रातील बातम्यांवरुन सदर बाब निदर्शनास आली आहे.
(२) अंशतः खरे आहे.
दिनांक २२ जानेवारी, २०१७ रोजी कोणतीही पूर्वसूचना न देता फर्ग्युसन रोड वरील शाळा बंद करुन औंध येथे स्थलांतरीत केली असून सर्व विद्यार्थ्यांना (एकूण २५) औंध येथे स्थलांतरीत केले आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) व (५) विद्यार्थी व पूर्व प्राथमिक शाळा स्थलांतरीत केल्याचे शाळा प्रशासनाकडून सांगण्यात आल्याने कारवाई करण्यात आलेली नाही.

---

**अकोला (जि.अकोला) येथील वसंत देसाई स्टेडियम परिसरात कॅफे ओलीम्पिया नामक व्यवसायिक हॉटेल सुरु करण्यात आल्याबाबत**

**(१८) ७४४१० (२०-०४-२०१७). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जिल्हा अकोला) येथील वसंत देसाई स्टेडियमस्थीत धावपथाला लागून कॅफे ओलीम्पिया नामक व्यवसायिक हॉटेल सुरु करण्यात आले असून हॉटेलसाठी कोणतेही वाहनतळ तयार केले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कॅफे ओलीम्पिया या हॉटेलचे प्रवेशद्वार हे शहरातील मुख्य व वर्दळीच्या स्टेशन रोडवर असल्याने तसेच गि-हाईक रस्त्यावर दिसेल त्या ठिकाणी वाहने उभी करत असल्याने सतत छोटे खाणी अपघात होतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त, हॉटेलमध्ये खेळाडूंसाठी आवश्यक आरोग्यवर्धक पदार्थ नसून उच्च व्यवसायिक दर आकारण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बाब शासकीय कार्याचा एक भाग असल्याने, शासन प्रचलित आवश्यक नियमांची पूर्तता क्रीडा विभागाने केली आहे काय,

(५) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (१९-०६-२०१७) :**(१) होय.

अकोला येथील स्व. वसंत देसाई स्टेडियम येथे जिल्हा क्रीडा संकुल समिती, अकोला अंतर्गत सदर कॅफेटेरीया या बाबीचे बांधकाम करण्यात आलेले आहे. जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या उपलब्ध वाहन पार्कींगमध्ये खेळाडू व नागरीक त्यांची वाहने उभी करतात. या करिता स्वतंत्र वाहतळ तयार केले नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) होय. संकुल समितीमार्फत २ वेळा निविदा प्रक्रीया राबविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालकांनी पाषाण शाळांना विशेष प्रवर्गातंर्गत अनुदानित मान्यता देण्याबाबत**

**(१९) ७४६६१ (२०-०४-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालकांनी पाषाण शाळांबाबत शासनाला अहवाल सादर करुन संबधित शाळांना विशेष प्रवर्गातंर्गत अनुदानित मान्यता देण्यास दिलेल्या नकाराच्या पत्राला मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने निर्णय घेवून या पाषाण शाळातील विद्यार्थ्यांना शिक्षण हक्क कायद्यातील तरतूदीप्रमाणे विशेष बाबींतर्गत अनुदानित मान्यता द्यावी व शासन स्तरावर शालेय योजनांचा लाभ मिळावा यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०६-२०१७) :**(१) होय.

(२) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार प्रत्येक बालकाला शिक्षणाचा अधिकार प्रदान केल्यामुळे जेथे शाळेची सुविधा उपलब्ध होणार नाही अशा बालकाचे शिक्षण नजीकच्या शाळेत होणे आवश्यक आहे. त्यानुसार दगडखाण क्षेत्रातील केंद्रांमध्ये शिकत असणाऱ्या सर्व मुलांना नियमित शाळेत दाखल करुन शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी वाहतूक व्यवस्था प्रस्तावित करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्याप्रमाणे जिल्हयांना आदेश देण्यात आले आहेत.

वार्षिक कार्य योजना व अंदाजपत्रक २०१७-१८ मध्ये वाहतूकीसाठी दगडखाण क्षेत्रातील मुलांची संख्या प्रस्तावित करण्यात आलेली आहे. त्यामुळे इथून पुढील कालावधीत दगडखाण क्षेत्रातील मुलांच्या ने-आण ची व्यवस्था शासकीय खर्चाने नियमित शाळेत करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्यभरातील शाळांनी यू-डायसमध्ये नोंदविलेल्या आणि जनगणनेतील विद्यार्थी संख्येत प्रचंड तफावत असल्याबाबत**

**(२०) ७४६९१ (२०-०४-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय**

**वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण विभागाने शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित असलेल्या मुलांना शोधण्यासाठी शाळाबाहय सर्वेक्षण आयोजित केले असून राज्यभरातील शाळांनी यू-डायसमध्ये नोंदविलेल्या आणि जनगणनेतील विद्यार्थी संख्येत प्रचंड तफावत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सर्वेक्षणात मुंबईसह राज्यभरात ६५ ते ७० हजार मुले शाळाबाहय असल्याचा दावा शिक्षण विभागाने केला असून या आकडेवारीची तुलना केल्यास राज्यात सव्वाचार लाख मुले कोणत्याही शाळेच्या पटावर नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शिक्षण विभागाचे प्रधान सचिव यांनी दोन महिन्यात शाळाबाहय मुलांचा शोध घेण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार प्रत्येक मुला-मुलींना शालेय शिक्षण देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२०-०६-२०१७) :**(१), (२) व (३) होय.

(४) याबाबत जिल्ह्यांना अवगत करण्यात आले असून जिल्ह्यातील अशा शाळाबाह्य मुलांचा शोध करुन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात दाखल करण्याबाबत व सर्व मुलांची नावे सरल प्रणालीत नोदविण्याबाबत निर्देश दिले आहेत.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## राज्यात शैक्षणिक वर्ष २०१७ मध्ये इयत्ता सातवी व नववीचा अभ्यासक्रम बदलण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(२१) ७४८८१ (२०-०४-२०१७). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शैक्षणिक वर्ष २०१७ मध्ये इयत्ता सातवी व नववीचा अभ्यासक्रम बदलण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने अभ्यासक्रम बदलानुसार विद्यार्थ्यांना पुस्तके वेळेत मिळावीत याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०६-२०१७) :**(१) जून, २०१६ मध्ये इयत्ता सहावीची पुस्तके बदलण्यात आली व जून, २०१७ मध्ये त्याच मालिकेत इयत्ता सातवीची पुस्तके बदलण्यात येत आहेत. दरम्यानच्या काळात इयत्ता सहावी ते दहावी या स्तरावर अभ्यासक्रमात सुसूत्रता असावी या दृष्टीने वर्ष २०१७ मध्ये इयत्ता सातवी व नववीचा अभ्यासक्रम बदलण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(२) व (३) इयत्ता सातवी व नववीच्या पाठ्यपुस्तकांच्या पुनर्रचनेचे काम युध्दपातळीवर हाती घेण्यात आले आहे. बालभारती येथे एकूण आठ भाषा माध्यमांच्या इयत्ता सातवी व नववीच्या पाठ्यपुस्तकांचे काम प्राधान्याने हाती घेण्यात आले असून, सदर पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच उपलब्ध व्हावीत यासाठी संपूर्ण नियोजन करण्यात आले आहे.

---

### कोल्हापूर येथील "एकटी" या सामाजिक संस्थेने शहरातील कचरावेचक कुटुंबातील मुलांचे सर्वेक्षण केले असल्याबाबत

**(२२) ७५११५ (२०-०४-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील " एकटी " या सामाजिक संस्थेच्या वतीने मागणी केल्यानुसार जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान फक्त शहरातील कचरावेचक कुटुंबातील मुलांचे सर्वेक्षण केले परंतु जिल्हयातील इतर स्थलांतरीत कुटुंबातील मुलांचा यामध्ये समावेश केला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्हयातील वीटभट्टीवरील मजूर व कारखाना स्थळांवरील ऊस तोडणी मजूरांच्या वसाहतीवर सर्वेक्षण केले आहे काय,
(३) असल्यास, उक्त सर्वेक्षणाचा अहवाल शासनास सादर केला आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०६-२०१७) :**(१) कचरावेचक कुटुंबाचे सर्वेक्षण “एकटी” या सामाजिक संस्थेच्या मागणीनुसार दिनांक २९/११/२०१६ रोजी त्यांनी सुचविलेल्या ठिकाणी करण्यात आले आहे.

(२) व (३) २०१६-१७ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागात हंगाम कालावधीत स्थलांतरीत होऊन आलेल्या कुटुंबातील ८८४ बालकांना सर्वेक्षणानुसार नियमित शाळेत दाखल करण्यात आले आहे. तसेच शिरोळ तालुक्यात विटभट्टी कामगारांच्या कुटुंबासोबत स्थलांतरीत होऊन आलेल्या कन्नड माध्यमाच्या मुलांना नजीकच्या नियमित शाळेचे अंतर जास्त असल्यामुळे शाळेत ये-जा करण्यासाठी वाहतूक सुविधा पुरविण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**मौजे कांबा (ता.कल्याण,जि.ठाणे) येथील नळ पाणी पुरवठा योजनेस मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत मान्यता मिळण्याबाबत**

**(२३) ७५५९१ (२०-०४-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कांबा (ता. कल्याण, जि. ठाणे) येथील नळ पाणी पुरवठा योजनेस मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत दिनांक २६ डिसेंबर २०१६ रोजी वा त्यासुमारास तांत्रिक मान्यता देण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्वातंत्र्य प्राप्तीच्या ७० वर्षानंतरही कांबा ग्रामवासीय नदीचे गढूळ पाणी पीत असून उक्त योजनेस जिल्हापरिषद स्तरावर प्रशासकीय मान्यता द्यावयाच्या दृष्टीने तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर करावयाची आवश्यक कार्यवाही जिल्हा परिषद, ठाणे व पंचायत समिती, कल्याण येथील सबंधित अधिकाऱ्यांकडून अद्याप करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त योजनेस मान्यता मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (०३-०७-२०१७) :** (१) मौजे कांबा (ता.कल्याण) येथील नळ पाणी पुरवठा योजनेस मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत दि.१८.१०.२०१६ रोजी तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे. तसेच प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखालील तांत्रिक समितीने सदर योजनेस दि.२६.१२.२०१६ रोजी मान्यता दिली आहे.
(२) व (३) सदर योजनेस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांचे प्रशासकीय अध्यक्षतेखालील ठराव समितीमध्ये दि.३१/१२/२०१६ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. योजनेस प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर ई-निविदेची कार्यवाही सुरु करण्यात आली होती. परंतु दि.०४.०१.२०१७ ते दि.०९.०२.२०१७ पर्यंत कोकण शिक्षक मतदार संघाची आचारसंहिता असल्याने निविदा कार्यवाही करता आली नाही. तद्नंतर पहिली निविदा दि.०९.०२.२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली पण पुरेशा प्रमाणात निविदा प्राप्त न झाल्याने निविदा रद्द करण्यात आली. त्यानंतर दि.०५.०४.२०१७ रोजी पुनश्च: निविदा प्रसिध्द करण्यात

आली. परंतू योजनेत प्रस्तावित असलेल्या जलशुद्धिकरण केंद्राच्या कामाचा अनुभव कोणत्याही कंत्राटदाराकडे नसल्याने सदर निविदा रद्द करण्यात आली. व पुनश्च: दि.२५ मे २०१७ रोजी संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील आझाद मैदानातील २२ पैकी १६ क्लबची मैदाने एमएमआरडीएने मेट्रो प्रकल्पासाठी ताब्यात घेतल्याबाबत**

**(२४) ७६०१९ (२०-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आझाद मैदानातील २२ पैकी १६ क्लबची मैदाने एमएमआरडीएने मेट्रो प्रकल्पासाठी ताब्यात घेतली असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शालेय क्रिकेट स्पर्धांना कोणताही पर्याय शासनाने उपलब्ध करुन दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्नोक्त भाग १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने प्रश्नोक्त भाग २ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (१९-०६-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही. शालेय क्रिकेट स्पर्धासाठी आझाद मैदानातील बाधित न झालेल्या उर्वरित ९ खेळपट्टयांचा तसेच क्रॉस व ओव्हल मैदानातील खेळपट्टयांचा वापर करण्यात येतो. तसेच आवश्यकता वाटल्यास मरीन ड्राईव्ह येथील ५ खेळपट्टयांचाही वापर करण्यात येतो.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कलावंतांच्या प्रलंबित मागण्या मान्य करण्याबाबत**

**(२५) ७६२८१ (२०-०४-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कलावंत हा सद्यस्थितीत उपेक्षितांचे, दारिद्र्याचे तसेच हलाखीचे जीवन जगत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वी शासनाने कलावंताकरिता अनेक आश्वासने दिली आहे परंतू अद्यापही उक्त आश्वासने प्रलंबित असल्याने कलावंतासाठी असलेल्या सवलती त्यांच्यापर्यंत पोहचत नसल्याने राज्यातील बहुतांशी कलावंताना हलाखीचे जीवन जगावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कलांवताच्या प्रलंबित मागण्या मान्य करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०६-२०१७) :** (१) नाही.
(२) हे खरे नाही.
(३) लागू नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

### कासोदा (ता.एरंडोल, जि.जळगांव) या गावच्या नळपाणी पुरवठ्याबाबत

**(२६) ७७३९२ (२०-०४-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कासोदा (ता.एरंडोल, जि.जळगांव) या गावच्या नळपाणीपुरवठयाचा प्रस्ताव शासनाकडे माहे जानेवारी २०१५ पासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावांवर शासनाचा अंतिम निर्णय झाला आहे काय व सदर योजनेच्या कामाचे अंदाजपत्रक किती आहे,
(३) असल्यास, सदर निर्णयानुसार नळपाणीपुरवठा योजनेस मंजूरी देऊन सदर योजना कार्यान्वित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२०-०६-२०१७) :** (१) नाही.
(२) व (३) मौ. कासोदा (ता. एरंडोल, जि. जळगांव) नळ पाणी पुरवठा योजनेच्या रु. ११,०७,५०,८०७/- इतक्या किंमतीच्या अंदाजपात्रकास दि. २३ मार्च, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर योजनेच्या कामाची निविदा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत दि. ०२ मे. २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### आयसीटी योजने अंतर्गत कार्यरत कंत्राटी पध्दतीच्या हजारो शिक्षकांना सेवेत कायम करण्याबाबत

**(२७) ७७५०३ (०६-०५-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण देण्यासाठी केंद्र पुरस्कृत आयसीटी योजना आणली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजने अंतर्गत ८००० संगणक प्रशिक्षक कार्यरत असून या योजनेचा या वर्षाचा करार संपुष्टात आल्याले व नवीन करार न झाल्याने ८००० शिक्षक बेरोजगार झाले आहेत तर १६ लाख विद्यार्थी संगणक प्रशिक्षणापासून वंचित राहिले आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त संगणक प्रशिक्षकाना रोजगार तसेच विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्ण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (१९-०६-२०१७) :** (१), (२) व (३) आयसीटी ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यात Built, Own, Operate and Transfer (BOOT MODEL) तत्वावर ५ वर्षे कालावधीसाठी निविदेव्दारे नियुक्त करण्यात आलेल्या ऑपरेटर्सव्दारे राबविण्यात येते. या ५ वर्षाच्या कालावधीत संगणक प्रशिक्षकांनी शाळेतील शिक्षकांना प्रशिक्षित करणे आवश्यक आहे. प्रशिक्षित शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यामध्ये केंद्र शासनाच्या पर्यावरण जागृती मोहीमे अंतर्गत स्वराज्य संस्था स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमातुन दिले गेलेले प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(२८) ७७८०० (०६-०५-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये केंद्र शासनाच्या पर्यावरण जागृती मोहीमे अंतर्गत स्वराज्य संस्था स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमातुन दिले गेलेले २२०० प्रस्ताव कोणतीही कार्यवाही न करताच प्रलंबित असल्याचे दिनांक १ जानेवारी २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रामदास कदम (१९-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही. सदर योजनेंतर्गत दि.११ जुलै, २०१६ रोजी झालेल्या सुकाणू समितीच्या बैठकीत "दि.१ जुलै, २०१५ ते दि. १० जुलै, २०१६ या कालावधीत योजनेंतर्गत प्राप्त झालेले सर्व प्रस्ताव योजनेच्या मूळ स्वरूपात बदल करण्यात आल्याने तसेच वित्तीय तरतुदीची उपलब्धता पाहता अद्यापपर्यंत प्राप्त झालेले सर्व प्रस्ताव अमान्य करून योजनेच्या अनुषंगाने झालेला निर्णय संकेतस्थळावर अपलोड करण्यात यावा" असा निर्णय घेण्यात आला होता.
दरम्यान, शासनाच्या दि.०८.११.२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार दि.०५ जून ते ३० सप्टेंबर याकालावधी दरम्यान प्राप्त होणारे हरित संकल्पनासाठीचे प्रस्ताव दरवर्षी विचारार्थ घेण्यात

येणार आहेत. त्यानुसार दि.११.०७.२०१६ रोजी झालेल्या सुकाणू समितीच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेला निर्णय व दि. ८.११.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेला शासन निर्णय यानुसार सन २०१४ ते आतापर्यंत प्राप्त १८२ प्रस्ताव अमान्य करण्यात येत असल्याबाबत शासनाच्या http//:www.mahenvis.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

(२) प्रश्न उदभवत नाही.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील ६० पाणीपुरवठा योजना निधीअभावी बंद असल्याबाबत**

**(२९) ७७९७१ (२०-०४-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील ६० पाणीपुरवठा योजना मुख्यमंत्री पेयजल योजनेतंर्गत निधी न मिळाल्याने बंद झालेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र व राज्य शासनाकडून निधी न मिळाल्याने सदर पाणीपुरवठा योजना बंद झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौ. थडीपवनी (ता. नरखेड), मौ. नांद (ता. भिवापूर), मौ. खंडाळा खुर्द (ता. काटोल) व मौ. सावरगाव (ता. नरखेड) या ०४ नळ पाणीपुरवठा योजनांचा प्रस्ताव फ़ेरसादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उर्वरित ५१ नळ पाणीपुरवठा योजनांचे परिपुर्ण सविस्तर प्रकल्प अहवाल मान्यतेसाठी अद्याप शासनास प्राप्त झालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त योजनांचे परिपूर्ण सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०६-२०१७) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) मौ. सावरगाव, मौ. खंडाळा खुर्द व मौ. नांद या ०३ योजनांना प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखालील तांत्रिक समितीची मान्यता देण्यात आली असून, प्रशासकीय मान्यतेची पुढील कार्यवाही करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांना कळविण्यात आले आहे. तर मौ. थडीपवनी योजनेबाबत तांत्रिक समितीने दिलेल्या निर्देशानुसार सुधारित प्रस्ताव जिल्हा परिषदेकडून अद्याप अप्राप्त आहे.

(४) मुख्यमंत्री पेयजल कार्यक्रमांतर्गत समाविष्ट नागपूर जिल्हयातील ५९ योजनांपैकी १० योजनांना मान्यता देण्यात आली आहे. अन्य १० योजनांबाबत प्रधान सचिव यांचे

अध्यक्षतेखालील तांत्रिक समितीने उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा पुर्तता अहवाल जिल्हा परिषदेकडून अप्राप्त आहे. तसेच ०१ योजना तांत्रिक समितीने अव्यवहार्य ठरविली आहे. तर उर्वरित ३८ योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल शासनास मान्यतेसाठी अप्राप्त आहेत.

(५) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नागपूर जिल्ह्यातील प्रस्तावित कामांना मंजूरी देण्याबाबत मा. मंत्री (पाणीपुरवठा व स्वच्छता) यांचे अध्यक्षतेखाली व मा. मंत्री (उर्जा) यांचे उपस्थितीत दि.०५.०४.२०१७ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच विभागाच्या दि.२९.०४.२०१७ च्या शासन पत्रान्वयेही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांना सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌बवत नाही.

---

**रामटेक मनसर (जि.नागपूर) येथील ऐतिहासिक तलावाचे सौदर्यीकरण व पर्यावरण समृद्धी करणेबाबत**

**(३०) ७८२१९ (२०-०४-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक मनसर (जि.नागपूर) येथील ऐतिहासिक तलावाचे सौंदर्यीकरण व पर्यावरण समृद्धी करणे बाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. पर्यावरण मंत्री यांना माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. रामदास कदम (२१-०६-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे

(२) कार्यकारी अभियंता, लघु सिंचन विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांचा दिनांक ३१.१०.२०१५ रोजी प्राप्त झालेला प्रस्ताव दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजी झालेल्या सुकाणू समितीच्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आला होता. सदर बैठकीत प्रस्तावातील विकास कामांसाठी अन्य योजनेंतर्गत निधी प्राप्त होण्याबाबतची शक्यता पडताळण्याबाबत व तद्‌नंतर केवळ उर्वरित पर्यावरणीदृष्टया तलाव संवर्धनाची कामे एकूण ४.०० कोटीच्या मर्यादेत प्रस्तावित करण्याबाबत तसेच तलावाभोवती अतिक्रमण होत असल्याचे संबंधितांमार्फत सादर अहवालात नमूद असल्याने संबंधित स्थानिक यंत्रणेचा अतिक्रमण हटविण्याबाबत व Total rehabilitation केल्यानंतर प्रस्ताव सुकाणू समितीच्या बैठकीत विचारार्थ घेण्याचा सुकाणू समितीने निर्णय घेतला. सद्यस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थेकडून फेरप्रस्ताव अद्याप अप्राप्त आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शैक्षणिक प्रगतीच्या आढावा घेणारा प्रथम या शिक्षण संस्थेच्या अहवालाबाबत**

**(३१) ७८४६५ (२०-०४-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शैक्षणिक प्रगतीच्या आढावा घेणारा प्रथम या शिक्षण संस्थेचा अहवाल माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान प्रसिध्द करण्यात आला असून यात विद्यार्थ्यांची गणिताबाबत भिती असल्याचे तसेच खाजगी शाळांपेक्षा सरकारी शाळा सरस असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालात आणखी कोणत्या बाबी नमूद करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, या अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२३-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर अहवालामध्ये गणित विषयाबाबत १ ते ९ अंक ओळखता येणे, १० ते ९९ संख्या ओळखता येणे, वजाबाकी (दोन अंकी संख्यांची) व भागाकार (तीन अंकी संख्येला एक अंकी संख्येने भागणे) अशा चार क्षमतांमध्ये इयतानिहाय विद्यार्थी संपादणूक दिलेली आहे. तसेच विद्यार्थ्यांची इंग्रजी अक्षराची ओळख, इंग्रजी शब्द, वाक्यप्रचार या संदर्भातील क्षमता तसेच शाळेतील राबविण्यात येणा-या मध्यान्ह भोजन योजना, पिण्याचे पाणी, प्रसाधन गृह, गंथालय, विजेची उपलब्धता, संगणक या संदर्भात उहापोह केलेला आहे.

(३) दि. २२ जून, २०१५ च्या शासन निर्णयान्वये राज्यात प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम राबविण्यात येत असून, त्यानुसार प्रथम भाषा व गणित या विषयाच्या चाचण्या राज्यस्तरावरुन घेण्यात येतात. ज्या क्षमतामध्ये विद्यार्थ्यांना अडचणी असतील त्यासाठी कृती कार्यक्रम आखुन प्रत्येक विद्यार्थी प्रभृत्व पातळीकडे वाटचाल करु शकेल हा या कार्यक्रमाचा हेतु आहे. तसेच गणित विषयाचे शिक्षकांना प्रशिक्षण व शाळांना आवश्यक शैक्षिणिक साहित्य दिले जात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईसह राज्यातील पूर्व प्राथमिक प्रवेशासाठी पाल्यास ३० जुलैपर्यंत ६ वर्षे पूर्ण असावी अशी अट घातल्याबाबत**

**(३२) ७८८२५ (२०-०४-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वयात एकवाक्यता यावी या उद्देशाने शालेय शिक्षण विभागातर्फे प्राथमिक शिक्षण संचालकांच्या अध्यक्षतेखाली समिती

नियुक्त करण्यात आली असून समितीच्या अहवालानुसार सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून ३ वर्षापेक्षा कमी वय असणाऱ्या बालकांना प्ले ग्रुप किंवा नर्सरीच्या वर्गात प्रवेश द्यावा असा आदेश दिला आहे तर राज्य शिक्षण विभागाने शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रवेशासाठी पाल्यास ३० जुलैपर्यंत ६ वर्षे पूर्ण असावीत, अशी अट ठेवण्यात आली असून उक्त अटीत बदल करुन दिनांक ३० सप्टेंबर, पर्यंत पाल्यास ६ वर्षे पूर्ण असावीत असा निर्णय जाहीर केल्यामुळे पालकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाल्याची बाब माहे जानेवारी,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील सीबीएसई, आयसीएसई बोर्डाच्या काही नामांकित शाळांनी आदेशाचे पालन न करता व वयोमर्यादेचा विचार न करता विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) तसेच आरटीई अंतर्गत इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश वयोमर्यादेमध्ये बदल करण्यात आला असून, यापूर्वी ३० जुलै अखेर पाच वर्षपूर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना आरटीई अंतर्गत प्रवेश दिला जात होता मात्र या वेळी ३० सप्टेंबर २०१६ रोजी पाच वर्षे व चार महिने पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्याच्या शालेय शिक्षण विभागातर्फे आरटीई प्रवेशप्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविली जात असूनही सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यापर्यंत प्रवेशप्रक्रिया सुरुच राहते परिणामी अनेक विदयार्थी प्रवेशापासून वंचित रहात आहेत तर प्रवेश प्रक्रियेत होणाऱ्या निकषांच्या वारंवार बदलांमुळे खाजगी शाळाही प्रवेश नाकारीत असल्याचे तसेच उक्त कायदयांतर्गत २५ टक्के जागांवर विदयार्थ्यांना दिल्या जाणा-या प्रवेशाच्या नियमावलीत बदल करण्याचा शासन स्तरावर विचार सुरु असुन त्यानुसार विदयार्थ्यांना शाळा निवडीचा पर्याय राहणार नसल्याचे दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय त्यानुसार सर्वसामान्य विद्यार्थ्यांना अधिकाधिक प्रवेश मिळेल तसेच त्यांचे वर्ष वाया जाणार नाही व प्रवेश नाकारणाऱ्या खाजगी शाळांवर निर्बंध येतील यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (१९-०६-२०१७) :** (१) दि. २५ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये दि. ३० सप्टेंबर हा शाळा प्रवेशाच्या वयासाठी मानीव दिनांक निश्चित करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात भूजल तपासणीसाठी उभारण्यात येत असलेल्या प्रयोगशाळांतील अधिकारी व कर्मचारी भरण्याच्या प्रस्तावास मंजुरी मिळण्याबाबत**

**(३३) ७८९३७ (०६-०५-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २३ जिल्हयांमध्ये पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळांच्या बांधकामास मंजुरी देवून प्राथमिक टप्प्यात ७ कोटी २२ लक्ष रुपयांचा निधी शासनाने उपलब्ध करुन दिला, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात भूजल तपासणीसाठी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या १३८ उपविभागीय, २८ जिल्हा आणि ६ विभागीय प्रयोगशाळा उभारण्यात येत असून त्यासाठी आवश्यक असलेल्या प्रयोगशाळांतील अधिकारी व कर्मचारी भरण्याचा प्रस्ताव गत आठ महिन्यांपासून मंजुरीसाठी प्रलंबित असल्याची बाब माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदशर्नास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे, सदर प्रस्तावास शासनाकडून मंजुरी मिळण्यास किती कालावधी अपेक्षित आहे,

(४) असल्यास, उर्वरित जिल्हयातही पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा शासन सुरु करणार आहे काय व किती जिल्हयात प्रयोगशाळा बांधून झाल्या आहेत,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रयोगशाळा लवकरात लवकर बांधून वापरात आणण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (१३-०६-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत राज्यातील २३ जिल्हयांमध्ये जिल्हास्तरीय पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळांच्या रुपये ७ कोटी २२ लक्ष ढोबळ किंमतीच्या बांधकामांस दि. २८/१२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दिनांक ३०/०३/२०१७ च्या शासन निर्णयान्वये आणखी ३ जिल्हयांमध्ये जिल्हास्तरीय पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळांच्या रुपये १ कोटी ०९ लक्ष ढोबळ किंमतीच्या बांधकामांस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सदर प्रयोगशाळांच्या बांधकामासाठी मार्च २०१७ मध्ये रुपये १ कोटी ५० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

राज्यातील ६ विभागीय प्रयोगशाळांचे बळकटीकरण करण्यात येत आहे. तसेच २६ जिल्हयांमध्ये प्रयोगशाळांच्या बांधकामाची कार्यवाही सुरु आहे.

राज्य, जिल्हा व उपविभागीय प्रयोगशाळांकरिता आणि राज्य स्तरीय, विभाग स्तरीय व जिल्हा स्तरीय पाणी गुणवत्ता संनियंत्रण कक्षाकरिता आवश्यक मनुष्यबळासाठी पदे भरण्यास यापूर्वीच सन २०१५ मध्ये मान्यता देण्यात आली आहे.

(३) राज्य, जिल्हा व उपविभागीय प्रयोगशाळांकरिता आणि राज्य स्तरीय, विभाग स्तरीय व जिल्हा स्तरीय संनियंत्रण कक्षाकरिता भरावयाच्या एकूण ८१८ कंत्राटी पदांपैकी ५९४ पदांची भरती करण्यात आली आहे. उर्वरीत रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.
(४) व (५) राज्यातील सर्व जिल्हयात पाणी गुणवत्ता प्रयोगशाळा सुरु आहेत.
राज्यातील ६ विभागीय प्रयोगशाळांचे बळकटीकरण करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे २६ जिल्हयांमध्ये जिल्हास्तरीय पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा लवकरात लवकर बांधून वापरात येणेबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**राज्यातील मराठी शाळांमधील विद्यार्थ्यांच्या गळतीच्या प्रमाणात झालेली लक्षणीय वाढ**

**(३४) ७९३०५ (२०-०४-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.राजु तोडसाम (अर्णी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह राज्यातील मराठी शाळांमधील विद्यार्थ्यांच्या गळतीच्या प्रमाणात गत काही वर्षात लक्षणीय वाढ झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून मुंबईतील दोन मराठी शाळाही कमी झाल्याचे वास्तव राज्य शिक्षण विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या यु डायस अहवालातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमध्ये मराठी शाळांच्या प्रश्नांवर बैठक झाली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईतील मराठी शाळांचे अस्तित्व टिकविण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना मराठी शाळांकडे आकृष्ट करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. विनोद तावडे (२०-०६-२०१७) :** (१) पालकांचा कल हा आपल्या पाल्यास इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये घालण्याचा असल्याने त्याचा परिणाम मराठी माध्यमाच्या शाळांवर दिसून येत आहे.
(२) मुंबई विभागाच्या कलीना कॅम्पसमध्ये मराठी शाळांच्या प्रश्नावर शालेय शिक्षण विभागाकडून कोणतीही बैठक आयोजित करण्यात आलेली नव्हती.
(३) मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सेमी इंग्रजी बरोबरच विद्यार्थ्यांना इंग्रजी बोलता यावे म्हणून त्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांना ब्रिटीश कौन्सिल मार्फत इंग्रजी संभाषणाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच ज्ञानरचनावादाच्या माध्यमातून शिक्षण दिले जात असल्याने विद्यार्थी मराठी माध्यमाच्या शाळांकडे आकृष्ट होत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्हयातील वृध्द कलावंताच्या अनुदाना बाबत तसेच समिती गठित करण्याबाबत**

**(३५) ७९९९० (२०-०४-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हयातील वृध्द कलावंताच्या नविन समितीचे गत दहा वर्षापासून गठन झालेले नसून गेल्या तीन वर्षापासून १८० प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक जिल्हयात वृध्द कलावंताना मानधन देण्यासाठी प्रति वर्षाला ६० प्रस्ताव मंजुर करण्यात येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त जिल्हयातील प्रलंबित प्रस्तावाच्या मंजूरीकरिता तसेच समिती गठित करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०६-२०१७) :** (१) होय, बुलढाणा जिल्हयाकरिता वृध्द कलावंत नवीन समिती तीन वर्षापासून गठीत झालेली नाही. समिती गठीत न झाल्यामुळे प्रस्ताव प्रलंबित आहेत.

(२) होय, प्रत्येक वर्ष प्रत्येक जिल्हयातून प्राप्त झालेल्या प्रस्तावामधून ६० कलावंतांचे प्रस्ताव मंजूर करण्यात येतात.

(३) सदर प्रकरणी समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांनी कळविल्यानुसार त्यांनी समिती गठीत करण्यासाठी वेळोवेळी मा. पालकमंत्र्यांकडे पाठपुरावा केलेला आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील कोलवड व देऊळघाट (ता. बुलढाणा) व सांगळद तसेच बोराखेडी (ता. मोताळा) या निम शहरी (पेरी अर्बन) मध्ये समाविष्ट असलेल्या गांवामध्ये पाणी पुरवठा योजना कायान्वित करणे बाबत**

**(३६) ८००५२ (२०-०४-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील निम शहरी (पेरी अर्बन) कार्यक्रमांतर्गत कोलवड व देऊळघाट (ता. बुलढाणा) व सांगळद तसेच बोराखेडी (ता. मोताळा) या गावांचा समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त गावात निर्माण होणा-या पाणी टंचाईवर कायम स्वरूपी उपाय योजना करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती पाणी पुरवठा योजना मंजूर केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१४-०६-२०१७)** : (१) अंशत: खरे आहे.
जलस्वराज्य-२ कार्यक्रमाच्या जिल्हा परिषदेने तयार केलेल्या प्राथमिक निवड सुचीत या गावांचा समावेश करण्यात आला होता.
तथापि, सदर गावांमध्ये सद्य:स्थितीत अन्य पाणी पुरवठा योजना मंजूर असल्याने या गावांमध्ये जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजना प्रस्तावित करण्यात आलेली नाही.
(२) कोलवड ता. बुलडाणा येथे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजना मंजूर असून प्रगतीपथावर आहे. सद्य:स्थितीत या योजनेमधून अस्तित्वातील उंच जलकुंभावरुन पाणी पुरवठा सुरु आहे.
देऊळघाट ता. बुलडाणा करिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत देऊळघाट व ५ गावे प्रादेशिक नळ योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.
सांगळद व बोराखेडी ता. मोताळा या गावांचा समावेश मोताळा व चार गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेमध्ये असून या योजनेव्दारे पाणी पुरवठा सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आजेगाव (ता.सेनगाव,जि.हिंगोली) येथे जलस्वराज्य प्रकल्प अंतर्गत बांधण्यात आलेल्या पाण्याच्या टाकीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याबाबत**

**(३७) ८०२४० (२०-०४-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आजेगाव (ता.सेनगाव, जि.हिंगोली) येथे जलस्वराज्य प्रकल्प अंतर्गत बांधण्यात आलेल्या पाण्याच्या टाकीचे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्यामुळे टाकीतून पाण्याची गळती सुरु असून उक्त टाकी केव्हाही कोसळण्याचा धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने पाण्याच्या टाकीचे निकृष्ट दर्जाचे काम करणा-या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत तसेच सदरहू टाकीचे काम चांगल्या दर्जाचे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१४-०६-२०१७)** : (१) व (२) हे खरे नाही.
सदर योजना ही जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत झालेली असून ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. योजनेची देखभाल दुरुस्ती व परीक्षण ग्रामपंचायत आजेगाव मार्फत करण्यात येते. सद्य:स्थितीत उद्भव विहीरीस पाणी नसल्यामुळे टाकीमध्ये पाणी भरले जात नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हंबर्डी ( ता.यावल जि.जळगाव) या गावाचा मुख्यमंत्री पाणीपुरवठा योजनेत समावेश करणे बाबत**

**(३८) ८०५२९ (२०-०४-२०१७). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हंबर्डी (ता.यावल जि.जळगाव) या गावाचा मुख्यमंत्री पाणीपुरवठा योजनेत समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावाचा उक्त योजनेत समावेश असूनही पाणीपुरवठ्याच्या कामाला अद्यापही मंजुरी दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गाव आमदार आदर्श दत्तक गाव असूनही याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचे दिसून आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गावात पाणीपुरवठ्याचे काम तात्काळ सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (२०-०६-२०१७) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) नाही.

(४) सदर गाव राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या सन २०१७-१८ च्या कृती आराखड्यात प्रस्तावित करण्यात आले असून, आराखड्यास मंजूरी मिळाल्यानंतर योजना राबविण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड येथील शासकीय क्रिडा संकुलात असलेले पावर लिपि-टीगचे मोफत प्रशिक्षण केंद्र बंद असल्याबाबत**

**(३९) ८०७२३ (२०-०४-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील शासकीय क्रिडा संकुलात असलेले पावर लिफ्टिगचे मोफत प्रशिक्षण केंद्र गत काही महिन्यापासून बंद अवस्थेत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रशिक्षण केंद्र बंद असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, हे प्रशिक्षण केंद्र तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (१९-०६-२०१७)** :(१), (२) व (३) हे खरे नाही.
सदर प्रशिक्षण केंद्र हे २०१२ ते आजपर्यंत अविरतपणे सुरु असून प्रशिक्षण केंद्रात १२ मुले व ६ मुली सायंकाळच्या सत्रात सराव करीत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील प्लॅन अंतर्गत खासगी शाळेवर काम करणा-या ४२१ प्राथमिक शिक्षकांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत**

**(४०) ८०७३१ (२०-०४-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील प्लॅन अंतर्गत खासगी शाळेवर काम करणा-या ४२१ प्राथमिक शिक्षकांचे वेतन गेल्या दोन महिन्यापासून थकित आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शिक्षकांचे वेतन थकीत असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या शिक्षकांना तातडीने वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२२-०६-२०१७)** : (१) होय.
(२) व (३) राज्यातील खाजगी शाळेतील प्राथमिक शिक्षकांचे पुरेशा अनुदानाअभावी थकीत राहिलेले वेतन अदा करण्यासाठी शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक ०४.०३.२०१७ अन्वये अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील रेशनिंग फेडरेशनच्या मागण्यांबाबत**

**(४१) ८०९६४ (०६-०५-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रेशनिंग फेडरेशनने दिनांक १ जानेवारी, २०१७ रोजी पासून आपल्या विविध मागण्या करीता राज्यव्यापी आंदोलन सुरु केले असून सांगली शहर व ग्रामीण सरकारमान्य रास्त भाव धान्य दुकानदार संघ व आखिल भारतीय स्वस्त धान्य दुकानदार, रॉकेल परवाना धारक महासंघ यांनी दिनांक १० जानेवारी,२०१७ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना आपल्या न्याय मागण्यांचे लेखी निवेदन दिले , हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात सध्या रॉकेल दुकानदारांना १० टक्के कोटा मिळत असल्याने जागाभाडे, कर भांडवल व्यवस्थापन खर्च यामध्ये तोटा सहन करावा लागत असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रेशनिंग फेडरेशनच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे, या मागण्यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०६-०६-२०१७) :** (१) होय हे खरे आहे.
(२) सद्यस्थितीत राज्यातील बिगर गॅसजोडणी शिधापत्रिकाधारकांना विहीत परिमाणानुसार वितरीत करण्याकरिता सर्व जिल्हयांना त्यांच्या मागणीनुसार व केंद्र शासनाकडून राज्यास उपलब्ध होण-या कोटयाच्या प्रमाणात केरोसिन नियतन मंजूर करण्यात येत आहे. सर्व केरोसीन परवानाधारकांना त्यांच्याकडील बिगर गॅसजोडणी शिधापत्रिकाधारकांच्या संख्येच्या प्रमाणात केरोसिन नियतन देण्यात येते. तसेच त्यांना नियमानुसार अनुज्ञेय कमीशनही देण्यात येते.
(३) संघटनेच्या प्रतिनिधीसोबत दि.१२.०२.२०१७ रोजी अमरावती येथे बैठक घेण्यात आली आहे. सदर बैठकीमध्ये संघटनेच्या मागण्यांसंदर्भात पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.
१) सुधारित धान्य वितरण योजनेत दुकानदारांची हमालीच्या नावाखाली सर्रास लुट सुरु आहे.
अभिप्राय - पी.आय.एल. क्रमांक १०१/२०१६ प्रकरणी विशेष वकील नेमून शासनाची बाजू प्रभावीपणे मा.उच्च न्यायालयात मांडून शिधावाटप दुकानदारांना योग्य न्याय मिळेल यासाठी शासन प्रयत्नशील आहे.
२) शासकीय गोदामातून प्रति क्विंटल १ ते २ किलो धान्य कमी देण्यात येते.
अभिप्राय - प्रमाणिकरण बंद करुन शिधावाटप दुकानात धान्य मोजून देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.
३) संगणकीकरण कामासाठी शासनाकडून फॉर्म भरण्याचे प्रति फॉर्म रू.५ हे ही बऱ्याच ठिकाणी मिळाले नाही.
अभिप्राय - संगणकीकरण फॉर्मबाबत दि. १० फेब्रुवारी २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनस्तरावरून प्रि-प्रिंटेड फॉर्म संकलनकर्त्यास मानधन अदा करण्याकरिता सर्व क्षेत्रीय कार्यालयांना निधी वितरीत करण्यात आलेला आहे.
४) ज्या शिधापत्रिका धारकांजवळ आधारकार्ड नाही त्यांना आधार कार्ड काढण्यासाठी.
अभिप्राय- आधार क्रमांक नोंदणीसाठी शासनस्तरावरून व्यापक प्रसिध्दी देण्यात येत आहे.
५) यवतमाळ जिल्हा हा आदिवासी व शेतकरी आत्महत्याग्रस्त असल्यामुळे बायोमेट्रिक मशीन (थंब मशीन) रास्तभाव दुकानात लावू नये.
अभिप्राय - बायोमेट्रिक मशीन यशस्वीरित्या कार्यरत करण्याकरिता आदिवासी वा दुर्गम भागातील भौगोलिक अडचणींचा विचार करून त्यावर शासनस्तरावरून आवश्यक ती उपाययोजना केली जात आहे.
६) ए.पी.एल. (केसरी) कार्डधारकांना धान्य देण्यात यावे.

अभिप्राय - राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत राज्यातील सर्व जिल्हयांना दिनांक १३.१०.२०१६ च्या शासन निर्णयान्वये सुधारित इष्टांक दिला असून, राज्यातील वंचित राहिलेल्या लाभार्थ्यांपैकी सुमारे १.५० कोटी लाभार्थ्यांचा राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये समावेश करण्यात येणार आहे. ए.पी.एल (केशरी) गटातील ग्रामीण भागाकरिता कमाल ▯४४,०००/- पर्यंत वार्षिक उत्पन्न आहे व शहरी भागाकरिता कमाल ▯५९,०००/- पर्यंत वार्षिक उत्पन्न आहे, अशा दि.३०.९.२०१६ पर्यंतच्या सर्व एपीएल (केशरी) लाभार्थ्यांचा समावेश होणार आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**बुलडाणा जिल्हयातील व्दारपोच अन्न-धान्य योजनेच्या थकीत देयकामुळे लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित असल्याबाबत**

**(४२) ८१५६० (२०-०४-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत लाभार्थ्यांच्या घरांपर्यंत स्वस्त धान्य पोहचविण्यासाठी शासनाने सुमारे ४ महिन्यांपूर्वी 'द्वारपोच अन्न धान्य योजना' सुरू केली असून जिल्हास्तरावर संस्थेला वाहनचालकाचे कंत्राट देण्यात आले असून बुलढाणा जिल्हयातील कंत्राटदार मागील ४ महिन्यांपासून धान्य ग्राहकांच्या घरांपर्यंत पोहोचवित असतानाही, सदरहू कंत्राटदारांना आजमितीस वाहनांच्या भाडयाची देयके शासनाकडून न मिळाल्यामुळे वाहनधारकांनी सेवा थांबविण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा जिल्हयात शासनाची १६गोदामे असून या गोदामातून १५३६ स्वस्त धान्य दुकानापर्यंत धान्य पोहोचविण्यात येत असून या योजनेंतर्गत जिल्हयातील लाभार्थ्यांना १लाख २६ हजार क्विंटल धान्य वाटप करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाहन सेवा थांबविण्याचा निर्णय घेतल्यामुळे या योजनेंतर्गत येणा-या अंत्योदय योजना, शेतकरी लाभार्थी योजना, प्राधान्य योजनेतील लाभार्थी अन्न धान्यापासून वंचित राहिला आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, उक्त देयके अदा करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२१-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही. वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. अंत्योदय योजना, शेतकरी लाभार्थी योजना, प्राधान्य योजनेतील लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहीलेला नाही.

(४) चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. वाहतूकदारास पहिल्या टप्प्याची देयके अदा केलेली आहेत. दुसऱ्या टप्प्याची देयके सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नकोडा (जि.चंद्रपूर) गावातील तलावातील दुषित पाण्यामुळे मासे मृत झाल्याबाबत**

**(४३) ८१७७९ (२०-०४-२०१७). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नकोडा (जि.चंद्रपूर) गावातील तलावातील दुषित पाण्यामुळे मासे मृत झाल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तलावातील पाणी दूषित होण्याची कारणे काय आहेत तसेच दुषित पाण्यामुळे मासे मृत्यूमुखी पडल्याने उक्त गावातील मत्स्यव्यावसायिकांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त मत्स्यव्यावसायिकांना मोबदला मिळण्याकरिता तसेच संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२१-०६-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) म.प्र.नि. मंडळाच्या अधिकाऱ्यांनी दि.०१.०३.२०१७ रोजी नकोडा तलाव व परिसरास भेट देऊन पाहणी केली असता, सदर तलाव हा वे.को.लि.च्या बंद असलेल्या खाणीत पाणी जमा होऊन तयार झालेला तलाव असून नकोडा गावातील सांडपाणी विनाप्रक्रिया नाल्यावाटे तलावास जाऊन मिळत असल्याचे आढळले. सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय (तां), चंद्रपूर यांच्या दि. ०१.०३.२०१७ च्या अहवालानुसार, नकोडा येथील तलावाच्या दि.२७.१२.२०१६ रोजी पाहणी दरम्यान तलावामध्ये मासे मृत झाल्यामुळे गांवातील स्थानिक १२ ते १५ मत्स्यव्यवसायिकांचे नुकसान झालेले आहे. तसेच संबंधीत ग्राम पंचायत, नकोडा यांनी कुठल्याही प्रकारची सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा पुरवलेली नाही. नकोडा ग्रामपंचायतीस सांडपाणी विनाप्रक्रिया जात असल्याने होणाऱ्या प्रदूषण नियंत्रणाकरीता कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

### पुणे जिल्हा परिषदेकडून जिल्ह्यातील कलाकारांचे मानधन प्रलंबित असल्याबाबत

**(४४) ८१८९१ (२०-०४-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अनागोंदी कारभारामुळे जिल्ह्यातील जेष्ठ साहित्यिक व कलाकारांचे मानधन प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मानधन ठेवणाऱ्या प्रलंबित अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची मागणी उक्त कलाकारांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रलंबित मानधन कलाकारांना अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२१-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### इयत्ता १२ वीच्या इंग्रजी माध्यमाच्या समाजशास्त्राच्या पुस्तकात कुरुप मुलीमुळे पालकांना हुंडा द्यावा लागतो याचा समावेश करण्यात आल्याबाबत

**(४५) ८१९९२ (२०-०४-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता १२ वी च्या इंग्रजी माध्यमाच्या समाजशास्त्राच्या अभ्यासक्रमात कुरुप मुलीमुळे पालकांना हुंडा द्यावा लागतो याचा समावेश करण्यात आला असल्याने शिक्षक व विद्यार्थ्यांकडून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०६-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सदर बाब वगळण्याच्या सूचना शासनाच्या दिनांक २३ मार्च, २०१७ च्या पत्रान्वये राज्यमंडळास देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनावरील मोझरी विकास आराखडया अंतर्गत चित्रपट निर्मिती व कॅसेट तयार करण्याबाबत**

**(४६) ८२२३६ (२०-०४-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनावरील मोझरी विकास आराखडया अंतर्गत चित्रपट निर्मिती व कॅसेट तयार करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी बैठक आयोजित करण्याकरीता मा.शिक्षण मंत्री यांना दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देण्यात येऊनही अद्यापी बैठक आयोजित करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू विषयाबाबत बैठक आयोजित करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०६-२०१७) :** (१) व (२) असे निवेदन प्राप्त झालेले आहे. त्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेली बैठक लवकरच घेण्यात येत आहे..

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील पाषाणशाळांना विशेष बाब म्हणून अनुदान देण्याच्या निर्णयाबाबत**

**(४७) ८२२३९ (०६-०५-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पाषाणशाळांना विशेष बाब म्हणून अनुदान देण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०६-२०१७) :** (१) व (२) नाही.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम,२००९ नुसार प्रत्येक बालकाला शिक्षणाचा अधिकार प्रदान केल्यामुळे जेथे शाळेची सुविधा उपलब्ध होणार नाही अशा बालकाचे शिक्षण नजीकच्या शाळेत होणे आवश्यक आहे. त्यानुसार दगडखाण क्षेत्रातील केंद्रांमध्ये शिकत असणाऱ्या सर्व मुलांना नियमित शाळेत दाखल करुन शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी वाहतूक व्यवस्था प्रस्तावित करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्याप्रमाणे जिल्ह्यांना आदेश देण्यात आले आहेत.

वार्षिक कार्य योजना व अंदाजपत्रक २०१७-१८ मध्ये वाहतूकीसाठी दगडखाण क्षेत्रातील मुलांची संख्या प्रस्तावित करण्यात आलेली आहे. त्यामुळे इथून पुढील कालावधीत दगडखाण क्षेत्रातील मुलांच्या ने-आण ची व्यवस्था शासकीय खर्चाने नियमित शाळेत करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्यात तालुका क्रिडा संकुल उभारणीसाठी अनुदान मर्यादा २५ लाखावरुन १ कोटीपर्यत वाढविली असल्याबाबत**

**(४८) ८३६७५ (२०-०४-२०१७). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात तालुका क्रिडा संकुल उभारणीसाठी दि २१.३.२००९ च्या शासन निर्णय क्रमांक सक्रियो-२००५/(प्र.क्र २५/०९) क्रीमुसे-१ नुसार अनुदान मर्यादा २५ लाखावरुन १ कोटीपर्यत वाढविली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नविन टाईप प्लॅननुसार बांधकाम करावयाचे असल्याने बांधकाम साहित्याच्या किंमतीत व बांधकाम मंजूरीत वाढ झाल्यामुळे रु १ कोटीमध्ये क्रिडा संकुलाचे बांधकाम पूर्ण होऊ शकणार नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने तालुका क्रिडा संकुल उभारणीसाठी अनुदान मर्यादेत वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (१९-०६-२०१७) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) राज्यातील विभागीय, जिल्हा व तालुका क्रीडा संकुलांच्या बांधकामाबाबत सुधारीत कार्यपध्दती विहित करण्यासाठी शासन निर्णय दि.०२.०९.२०१५ अन्वये राज्यस्तर समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने क्रीडा संकुलामध्ये क्रीडा सुविधा त्वरीत पूर्ण करणे, बांधकामास होणारा विलंब, अपु-या सुविधा पुर्ण करण्यासाठी शासन निर्णयात निर्देशित बाबनिहाय रक्कम व DSR रेटच्या अनुषंगाने झालेली वाढ, स्थानिक प्रचलित खेळांनुसार क्रीडा सुविधा निर्मिती बाबतचा बृहत् आराखडा तयार करणे, क्रीडा संकुलांसाठी केअर टेकर नियुक्ती करणे, विभागाच्या ठिकाणी जिल्हा क्रीडा संकुलांची बांधकामे करणे इ. विविध बाबींचा अभ्यास करुन आपला अहवाल शासनास सादर केला आहे. उपरोक्त अहवालामध्ये क्रीडा संकुलांच्या बांधकाम अनुदान मर्यादेत वाढ करण्याबाबत प्रस्तावित असून सदर अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बालभारती यावर्षी सातवी आणि नववीचा अभ्यासक्रम बदलणार असल्याबाबत.**

**(४९) ८३८३६ (२०-०४-२०१७). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावर्षी सातवी आणि नववीचा अभ्यासक्रम बदलणार असून नव्या अभ्यासक्रमाचा मसुदा बालभारतीने लोकांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी ऑनलाईन प्रकाशित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मसुद्यावर ऑनलाईन आणि लेखी स्वरुपात ५१८ हरकती आणि सूचना आल्या असून या सर्व हरकती आणि सूचनांचा विचार करण्यात येणार नसल्याबाबतचे मत बालभारतीने स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सूचना व हरकतीचा विचार न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२०-०६-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) नाही.

पुनर्रचित मसुदा दोन टप्प्यात महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) व राज्यमंडळ यांच्या संकेतस्थळावर अभिप्रायार्थ उपलब्ध करुन देण्यात आला होता. त्याला मिळालेल्या प्रतिसादांचा योग्य विचार करुनच अभ्यासक्रमातील क्षमता-विधाने अंतिम करण्यात आली आहेत.

(४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यात जलस्वराज्य योजनेंतर्गत नळ पाणी पुरवठा व जलशुद्धीकरण योजनेबाबत..**

**(५०) ८४११९ (२०-०४-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात शासनाच्या जलस्वराज्य योजनेंतर्गत नळपाणी पुरवठा व जलशुद्धीकरण योजनेचा लाभ शिरूर तालुक्याला मिळाला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रायोगिक तत्वावर शिरूर व ताडोबाची वाडी या दोन ठिकाणी सदर योजना राबविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेसाठी शासनाने निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (१३-०६-२०१७)** : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
शिरूर व ताडोबाची वाडी येथे सदर योजना राबविण्यात येणार आहे.
(३) शिरूर ग्रामीण व ताडोबाची वाडी, जिल्हा पुणे या गावांच्या अनुक्रमे रुपये १६४७.०४ लक्ष व रुपये ७२५.२२ लक्ष इतक्या ढोबळ रकमेच्या अंदाजपत्रकांस दि. २६ ऑगस्ट, २०१६ रोजी शासनाची प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून या दोन्ही योजनांची कामे सुरु झाली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.